# मिरा भाईंदर महानगरपालिका
## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www.mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय**

जा. क्र. मिभा / मनपा / मावज/१५५/2023-24 दिनांक: 05/03/2024

## // कार्यादेश //

प्रति,
मे. ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा. लि.
1305, सत्रा प्लाझा, सेक्टर- 19/D
नवी मुंबई, महाराष्ट्र 400 703

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडिया अकाऊंटस वार्षिक नोंदणी शुल्क भरणे .

संदर्भ :- 1. दि. 25 /01/2024 रोजीची ई-निविदा सूचना. (Tender ID 2024_MBMC_993196_1)
2. दि. 01/03/2024 रोजी मा. आयुक्त सो यांनी दिलेली मान्यता.
3. दि. 05 /03/2024 रोजीचा करारनामा.

मिरा भाईंदर महानगरपालिका महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडिया अकाऊंटस वार्षिक नोंदणी शुल्क भरणे कामी मा.आयुक्त सो यांची दि. 01/03/2024 रोजीच्या मंजुरीने आपले कामास दि. 05/03/2024 ते दि. 04/03/2025 (1 वर्षासाठी) खालील मंजूर दराने कार्यादेश प्रदान करण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | मंजूर दर (GST सह) रु. |
|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर महानगरपालिका महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडिया अकाऊंटस वार्षिक नोंदणी शुल्क भरणे. | रु. 2,95,000/- (अधिक GST) |

वरील सेवा माहिती व जनसंपर्क विभागाशी संपर्क साधुन पुरवठा करण्यात यावा.

Recieved
07/03/2024

(संजय शिंदे)
उपायुक्त (मावज)
मिरा भाईंदर महानगरपालिका



Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ CD 287881

जिल्हा कोषागार कार्यालय ठाणे

जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे

11 DEC 2023

मुद्रांक प्रमुख लिपीक / लिपीक

11-12-2023

## // करारनामा //

हा करारनामा **दि. ०५/०३/२०२४ रोजी करण्यात येत आहे. हा करारनामा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने मा. उपायुक्त (जनसंपर्क) सो., संजय शिंदे, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) जिल्हा- ठाणे, पिन कोड ४०११०१** यांच्यामार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज) इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल.

**मे. ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा. लि., व्यवस्थापक श्री. किशोर हिंगे, १३०५, सत्रा प्लाझा, प्लॉट नं- १९/२०, सेक्टर १९डी, पाल्म बिच रोड, वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३** यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल. यामध्ये करारनामा होत आहे.

ORNET Technologies Pvt. Ltd. Vashi, Navi Mumbai

Scanned with OKEN Scanner

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका, दि. ०५/०३/२०२४ पासून **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडीया अकाऊंट्सचे वार्षिक नोंदणी शुल्क भरणेकामी** कंत्राटदार यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेने **दि.२२/०१/२०२४** रोजीच्या मान्यतेनुसार **मिरा भाईंदर महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडीया अकाऊंट्सचे वार्षिक नोंदणी शुल्क भरणेकामी** मान्यतेनुसार ई-निविदा मागविण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदरचे काम करणेबाबत त्यांच्या **दि.०१/०३/२०२४** रोजीच्या वाटाघाटीनंतरच्या दरानुसार पुरवठा करणेस संमती दर्शविलेली आहे. सदरचा प्रस्ताव **Annexure - A** म्हणून संबोधण्यात येत आहे.

त्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशीलाचा विचार करुन व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाकरिता दिलेल्या संमतीनुसार **मा. आयुक्त यांच्या दि.०१/०३/२०२४ रोजीच्या** मंजुरी अन्वये व्दितीय पक्षीय यांना खालील अटीशर्तींच्या अधिन राहून **दि.०५/०३/२०२४ पासून दि.०४/०३/२०२५ पर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडीया अकाऊंट्सचे वार्षिक नोंदणी शुल्क भरणेकामी** करारनामा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

**<u>या कराराच्या अटी व शर्ती खालीप्रमाणे आहेत.</u>**

१. व्दितीय पक्षीय यांनी शुल्क भरण्याकरीता **Annexure - A** मध्ये नमुद केल्यानुसार शुल्क भरणा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या अटी-शर्तीनुसार करण्याचे मान्य केले आहे.

२. सदर कामाकरिता लागणारा आवश्यक तो कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था व्दितीय पक्षीय यांनी करावयाची आहे.

३. सदर शुल्क भरण्यासाठी रक्कम, साहित्य पुरवण्याची जबाबदारी किंवा कोणत्याही प्रकारची मशिनरी अथवा वाहन पुरवण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.

४. सदर कामासाठी व्दितीय पक्षीय यांनी महानगरपालिकेस सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम व्दितीय पक्षीय यांना द्यावयाच्या देयकाच्या ५ टक्केच्या दराने बँक गॅरेटी च्या स्वरुपात सदरचा करारानामा झाल्यापासुन तीन दिवसात प्रथम पक्षीय यांच्या कडे जमा करण्याचे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम भरणा केलेल्या वार्षिक शुल्काचा कालावधी पुर्ण झालेनंतर व्दितीय पक्षीय यांच्या मागणीनुसार परतावा करण्यात येईल. परंतु द्वितीय पक्षीय यांना कराराप्रमाणे काम पुर्ण न केल्यास सदरची अनामत रक्कम कोणतीही सुचना न देता जप्त करण्यात येईल.

५. सदर सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मागण्याचे अधिकार व्दितीय पक्षीय यांना राहणार नाहीत.

INET Technologies Pvt. Ltd. Navi Mumbai

Scanned with OKEN Scanner

६. व्दितीय पक्षीय यांनी सदरची बँक गॅरंटी मुदतीत जमा न केल्यास व्दितीय पक्षीय यांच्या देयकातून उपरोक्त बँक गॅरंटीची रक्कम कपात करुन अंतिम देयक अदा केले जाईल असे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केलेले आहे.

७. व्दितीय पक्षीय केलेल्या कामाच्या गुणवत्ता, दर्जा, मापे, परिणाम याबाबत काहीही तक्रार उदभवल्यास त्याबाबत तक्रार दुर करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहील.

८. व्दितीय पक्षीय यांनी महानगरपलिकेने ठरविलेल्या कार्यादेशातील नमुद मुदतीत काम करण्याचे मान्य केले आहे. परंतु व्दितीय पक्षीय यांनी काम न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही ठेकेदाराकडून काम पुर्ण करुन सदर कामासाठी होणारा जादा आकार व्दितीय पक्षीय यांच्या जमा केलेल्या सुरक्षा अनामत रकमेमधून वसुल करण्यात येईल.

९. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षती झाल्यास व्दितीय पक्षीय क्षतीपुर्तीची हमी देत आहे.

१०. व्दितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेल्या काम करण्यास खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यास व्दितीय पक्षीय यांच्या सोबत केलेल्या करारनामा रद्द करुन व्दितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यास राहील.

११. द्वितीय पक्षिय यांनी त्यांना नेमुन दिलेले **शुल्क भरणा करण्याचे** कांम पुर्ण केल्यानंतर ठरवुन दिलेल्या मंजुर दरानुसार **(Annexure - A)** योग्य ते लेखी बिल महानगरपालिकेस सादर करतील. प्रथम पक्षिय, सदर बिलाची रक्कम द्वितीय पक्षिय यांना देवु करतील. द्वितीय पक्षिय **यांनी वार्षिक शुल्क भरण्याच्या कामाचे** देण्यात येणाऱ्या देयकामध्ये नियमाप्रमाणे देय असलेले सर्व कर समाविष्ठ आहे. सर्व शासकिय कर, वॅट प्रॉव्हीडन्ड फन्ड, किमान वेतन आयोगानुसार वेतन अन्य कर भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१२. द्वितीय पक्षिय यांना **वार्षिक शुल्क भरण्याचे** काम उप ठेकेदारास देता येणार नाही.

१३. करारातील अटी आणि शर्ती मुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षिय यांची राहील.

१४. मुंबई मुद्रांक शुल्क कायदा अन्वये सदर करारनाम्यासाठी योग्य ते **मुद्रांक शुल्क (Stamp Duty)** भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षिय यांची राहील.

१५. कामाच्या दरम्यान द्वितीय पक्षिय यांच्या कोणत्याही उपकरणास काहीही हानी झाल्यास, चोरी झाल्यास भरपाई करुन देण्याची जबाबदारी प्रथम पक्षाची (मनपाची) राहणार नाही.

१६. एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी उपकरणासहित जाण्याचा खर्च मनपा द्वितीय पक्ष यांना देणार नाही.

१७. सदर करारनाम्याची मुदत **दि. ०५/०३/२०२४ पासून बारा महिन्यांसाठी** राहील.

१८. सदर यंत्रणा कार्यान्वित झाल्यानंतर सदर यंत्रणा चालविण्याचे प्रशिक्षण विनामुल्य महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कर्मचा-यांना देण्याची जबाबदारी द्वितीय पक्षिय यांची राहिल.

१९. द्वितीय पक्षिय यांनी सदर कामाचे देय रक्कम अदा करण्यासाठी प्रथम पक्षिय म्हणजेच माहिती व जनसंपर्क विभाग, मनपा यांच्याकडे देयक जमा करतेवेळी काम पुर्ण केल्याच्या तपशीलासह जमा करावी.

२०. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Twitter, facebook आणि Instagram वरील सोशल मिडीया

Technologies Pvt. Ltd. Navi Mumbai

Scanned with OKEN Scanner

अकाऊंट्सचे वार्षिक शुल्क भरल्याचे संपूर्ण तपशील माहिती व जनसंपर्क विभागास अवगत करण्यात यावी.

२१. निविदा स्विकृतीनंतर कार्यादेशात नमुद अटी व शर्ती तसेच प्राप्त सुचनेनुसार वार्षिक शुल्क भरण्याची कार्यवाही करावी लागेल..

२२. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या Twitter, facebook आणि Instagram वरील सोशल मिडीया अकाऊंट्सचे वार्षिक शुल्क भरल्याचे **जनसंपर्क अधिकारी** यांना आवश्यकता वाटेल तेव्हा दाखविण्याची व्यवस्था स्वखर्चाने निविदाकारास करावी लागेल.

२३. मंजुर निविदाकारस तात्काळ विहित रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा करुन दयावा लागेल.

२४. मंजुर केलेल्या कामाच्या रकमेचा **५ टक्के** सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल. सदर रकमेतुन भरलेली इसारा रक्कम वळती करुन घेण्यात येईल. इसारा रकमेवर/सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

२५. निविदाकाराने आपले दर सर्व करासह देणे आवश्यक आहे. निविदाकाराची कुठलीही अट स्वीकारण्यात येणार नाही अथवा निविदा दरापेक्षा जास्त दर दिला जाणार नाही.

२६. निविदेतील दर निविदा उघडल्यापासुन **१२० दिवसांसाठी** ग्राहय धरण्यात येतील.

२७. न्यायालयीन बाब उदभवल्यास ठाणे न्यायालय कार्यक्षेत्र राहील. तसेच कोणत्याही कारणामुळे प्रकरण न्यायालयात गेल्यास महापालिकेस न्यायालयीन कार्यवाहीसाठी होणारा सर्व खर्च निविदाकारास करावा लागेल.

२८. कोणतीही निविदा संपुर्णतः किंवा अंशतः कोणतेही कारण न देता स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राखुन ठेवले आहेत.

२९. याकामी **Facebook, Instagram, Twitter, Credintials (User Id व Password)** आपणांस देण्यात आलेला आहे. सदर **Credintial** इतर कोणासही **Share** करू नये. महानगरपालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय कोणतीही **Post Public** करू नये. याबाबत गैरवापर केल्यास आपणांस जबाबदार धरण्यात येईल.

३०. कोणत्याही कारणामुळे महापालिका व निविदाकार यांच्यात वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त सो. लवाद म्हणुन काम पाहतील व त्यांचा निर्णय निविदाकारावर बंधनकारक असेल.

३१. निविदेत नमुद केलेले एकुण परिमाण अंदाजे दिलेले असुन त्यात वाढ/घट होण्याची शक्यता आहे. तथापी मंजुर दरानेच सेवा पुरवावी लागेल. त्यांकरिता वाढीव दराची मागणी करता येणार नाही.

३२. निविदाधारकांनी निविदेतील वरीलप्रमाणे सर्व घटकांचे दर सादर करणे आवश्यक आहे. सर्व घटकांचे दर न सादर करणा-या निविदाधारकांची निविदा ग्राहय धरली जाणार नाही.

३३. ठेकेदारास सदर कामाचे देयक वार्षिक पध्दतीने देण्यात येईल.

वरील सर्व अटी शर्ती उभय पक्षिय यांना मान्य असुन त्याकरिता उभयपणे सहया करण्यात येत आहे.

QNET Technologies Pvt. Ltd. Navi Mumbai

Scanned with OKEN Scanner

प्रथम पक्षीय :-

श्री. संजय शिंदे
मा. उपायुक्त (जनसंपर्क) सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका.

साक्षीदार :
1) राजकुमार घरत
2) जितेंद्र कांबळे
3) जयवंत भवर

द्वितीय पक्षीय :-

1) किशोर हिंगे

श्री. किशोर हिंगे
मे. ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा. लि.,
१३०५, सत्रा प्लाझा, प्लॉट नं- १९/२०,
सेक्टर १९डी, पाल्म बिच रोड,
वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३

ORNET Technologies Pvt. Ltd.
Navi Mumbai

Scanned with OKEN Scanner

# Annexure – A

| अ.क्र. | तपशील | मे.ऑरनेट टेक्नॉलॉजीस प्रा. लि. यांचे मंजुर दर (GST सह) रु. |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिकेचे Facebook, Instagram and Twitter या सोशल मिडीया अकाऊंट्सचे वार्षिक नोंदणी शुल्क भरणे | रू २,९५,०००/- |

ORNET Technologies Pvt. Ltd.

साक्षीदार :- 1) अनिकेत मानोरकर
(अति. आयुक्त) - [signature]

2) दिपक खांबीत
(शहर अभियंता) - [signature]

सन 2023 /2024 [illegible]सभा नोंदवही
अनुं. क्र. ११०२ दि. 20/ 03 /24 अन्वये
नोंद करणेत आली

[signature]
महापालिका सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner